मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भव्य गंगा आरती साठी हजारो भाविक उपस्थित राहणार

## छटपूजा निमित्त विश्व श्रीराम सेनेने केला मोशी इंद्रायणी घाट स्वच्छ





**पिंपरी | प्रतिनिधी**

सूर्य देवतेची उपासना करणारे छट पूजा व्रत उत्तर भारतात आणि विशेषतः बिहार मध्ये मोठ्या भक्ती भावाने साजरे केले जाते. मागील अनेक वर्षांपासून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात देखील छटपूजा श्री सूर्यषष्ठी महाव्रत मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. गतवर्षी प्रमाणे श्री विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथील इंद्रायणी नदीच्या घाटावर छटपूजा सायंकाळी, ६:०४ वाजता, सूर्यास्त वेळी हजारो भाविकांच्या साक्षीने वाराणसी येथून आलेल्या प्रतिनिधींच्या हस्ते भव्य गंगा आरती करून साजरा करण्यात येणार आहे. समारोप मंगळवारी (दि.२८) सकाळी ६:३३ वाजता, सूर्योदय वेळी सूर्याला अर्ध्य देऊन होईल. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री विश्व श्रीराम सेनेचे संस्थापक अध्यक्ष लालबाबू अंबिकालाल गुप्ता यांनी केले आहे.

यानिमित्त श्री विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथील इंद्रायणी नदी घाटावर शुक्रवारी, शनिवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सध्या इंद्रायणी नदीत कचरा व गाळ साचून पाणी व परिसर अस्वच्छ झाला आहे. नदीत टाकण्यात आलेले निर्माल्य, घट, प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, काचा, फाटके कपडे, थर्माकोल, लाकडी मंदिरे, प्लेट, ग्लास, नारळ, फळे आदी कचरा व गाळ काढून नदी घाट परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला.

सूर्य देवतेची उपासना करणारे छट पूजा व्रत उत्तर भारतात आणि विशेषतः बिहार मध्ये मोठ्या भक्ती भावाने साजरे केले जाते. मागील अनेक वर्षांपासून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात देखील छटपूजा श्री सूर्यषष्ठी महाव्रत मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो या नदीघाटा वर भोसरी, मोशी, पिंपरी नेहरू नगर, चिंचवड, चिंबळी, कुरुळी, कोयाळी, चाकण, मोशी, जाधववाडी, चिखली, निघोजे, आकुर्डी, तळवडे, आळंदी कृष्णानगर आदी भागातून भक्त भाविक पूजे साठी उपस्थित राहणार आहेत. यावेळी पारंपरिक पूजा करून भजन, छट लोकगीते सादर करण्यात येतील व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे अशी माहिती लालबाबू गुप्ता यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

---

# ‘मस्ती की पाठशाला’मध्ये मुलांच्या चेहऱ्यावर उमटले आनंदाचे हसू..

## दिवाळीनिमीत्त संतोष सौंदणकर यांच्या हस्ते मुलांना फटाके वाटप..



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती सदस्य तसेच चिंचवड विधानसभा शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर यांच्या मंगल फाउंडेशनच्या वतीने ‘मस्ती की पाठशाला’ येथे दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमात संतोष सौंदणकर यांच्या हस्ते मुलांना फटाके वाटप करण्यात आले. फाउंडेशनचे हे सलग पाचवे वर्ष आहे.

सौंदणकर यांनी या प्रसंगी तेथील गुरुजनांशी आणि मुलांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, “समाजातील प्रत्येक घटकाने अशा मुलांसोबत सण साजरा करावा, कारण त्यांचा आनंदच आपल्याला खरी दिवाळी दाखवतो.” त्यांनी मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरित केले. सामाजिक बांधिलकी जपत दिवाळीचा आनंद सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता.

कार्यक्रमात फिरोज खान, सतिश पोपळे, गणेश ओगले, अक्षय भोसले, सुमित कांबळे, रूबान शेख आणि सुनील ढमाले हे मान्यवर उपस्थित होते.

फटाक्यांचा आवाज आणि मुलांच्या हास्याने परिसर दुमदुमून गेला. आनंद, उत्साह आणि सामाजिक जाणीवेची सांगड घालणारा हा उपक्रम दिवाळीच्या सणाला विशेष अर्थ देणारा ठरला.

# पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभागनिहाय मतदार यादी फोडण्यास वेग

## महापालिकेचे 1 हजार 800 कर्मचारी प्रत्यक्ष प्रभागात जाऊन घर-घर भेट देऊन मतदारांची पडताळणी करत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभागनिहाय मतदार याद्या फोडण्याचे काम वेगात सुरू आहे. या कामासाठी नेमलेले 1 हजार 800 अधिकारी व कर्मचारी कामात व्यस्त आहेत. प्रत्यक्ष प्रभागात जाऊन सीमेवरील घरांना भेट देऊन मतदारांची नावांची पडताळणी केली जात आहे.

महापालिकेच्या 4 सदस्यीय एकूण 32 प्रभाग आहेत. ती प्रभागरचना 6 ऑक्टोबरला अंतिम होऊन, ती प्रसिद्ध करण्यात आली आहे. तीन प्रभाग फोडून शेजारच्या प्रभागात तो परिसर जोडण्यात आला आहे. त्यामुळे मतदार संख्येत मोठा बदल झाला आहे. एका प्रभागातील 7 ते 8 हजार मतदार दुसऱ्या प्रभागात समाविष्ट झाले आहेत. त्यामुळे एससी व एसटीच्या जागेतील आरक्षणात बदल झाला आहे. परिणामी, अनेक इच्छुकांसह माजी नगरसेवकांसमोर पेच निर्माण झाला आहे. त्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले हे उच्च न्यायालयात गेले आहेत. न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

दुसरीकडे, महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादी फोडण्याचे प्रत्यक्ष काम शनिवारी (दि.18) सुरू झाले आहे. त्या कामकाजासाठी प्रगणक, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षक असे एकूण 1 हजार 800 अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या सर्वांना मतदार यादी फोडण्याचे प्रशिक्षण गुरूवारी (दि.17) देण्यात आले.

प्रत्येक प्रगणक व बीएलओंना प्रभागातील मतदान केंद्रातील एका भाग यादीची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार, ते काम करीत आहे. त्या भागात समाविष्ट असलेल्या घराची पाहणीही केली जात आहे. तसेच, प्रभागातील सीमेवरील भागांतील मतदारांची बारकाईने तपासणी केली जात आहे. एका प्रभागाचा मतदार दुसऱ्या प्रभागात समाविष्ट होऊ नये, यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे. दिलेल्या मुदतीमध्ये काम पूर्ण न केल्यास कारवाई करण्यात येणार आहे.



### विधानसभेच्या मतदार याद्या फोडून यादी

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्व 32 प्रभागांची प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी एकूण 1 हजार 800 प्रगणक, बीएलओ व पर्यवेक्षक नेमण्यात आले आहेत. ते सर्व कर्मचारी हे महापालिकेचे आहेत. त्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. मुदतीमध्ये काम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत, असे महापालिकेच्या निवडणूक मतदान कक्षाचे सहाय्यक आयुक्त तथा सहाय्यक प्राधिकृत अधिकारी किरणकुमार मोरे यांनी सांगितले.

### पाच नोव्हेंबरपर्यंत मतदार यादी तयार होणार

» प्रभागनिहाय 32 प्रभागाची प्रारूप मतदार यादी 5 नोव्हेंबर 2025 पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. त्यानंतर 6 नोव्हेंबरला प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करून 14 नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत. त्यावर सुनावणी घेऊन 28 नोव्हेंबरला प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर शहरातील शाळांमध्ये असलेल्या मतदान केंद्रांचे ठिकाणी निश्चित केली जातील. त्या मतदान केंद्राची अंतिम यादी 4 डिसेंबरला प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर 10 डिसेंबरला मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पिंपरी मेट्रो स्टेशनवरील चौथा जिना काम कासव गतीने, प्रवाशांना गैरसोय

## कमला क्रॉस बिल्डिंगजवळील जिना व लिफ्ट उभारणीसाठी नोव्हेंबर 2024 पासून सुरु असलेले काम अजूनही अपूर्ण

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी मेट्रो स्टेशनवरून मेट्रो साडेतीन वर्षापासून धावत आहे; मात्र स्टेशनच्या चौथ्या जिन्याचे काम अद्याप सुरूच आहे. कामाला सुरुवात होऊन एक वर्ष होत आले तरी, हे काम संपत नसल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. तसेच, पिंपरीहून मोरवाडीच्या दिशेने जाणारी बीआरटी मार्ग अनेक महिन्यांपासून ठेवण्यात आला आहे.

पिंपरी ते फुगेवाडी मेट्रो धावण्यास 6 मार्च 2022 ला सुरुवात झाली. सध्या पिंपरी मेट्रो स्टेशनवरून विक्रमी संख्येने प्रवासी ये-जा करत आहेत. महामेट्रोला पिंपरी स्टेशनमधून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत आहे. या स्टेशनला जोडणाऱ्या कमला क्रॉस बिल्डिंगजवळ जिन्याचे काम कासव गतीने सुरू आहे. तब्बल अडीच ते तीन वर्षे त्या ठिकाणी केवळ खोदून ठेवण्यात आले होते. त्यामुळे या ठिकाणी कचरा व घाण जमा झाली होती.

अखेर, नोव्हेंबर 2024 मध्ये कामास सुरुवात करण्यात आली. तेथे जिना, फिरते जिने व लिफ्ट बसविण्यात येत आहे. त्या ठिकाणाहून थेट स्टेशनवर ये-जा करता येणार आहे. एक वर्ष होत आले तरी, अद्याप काम सुरूच आहे. त्यामुळे तेथील पदपथ पूर्णपणे खराब झाला आहे. रस्त्यावर राडारोडा, खडी व इतर बांधकाम साहित्य पडून आहे. तसेच, बॅरिकेट्स लावण्याने रस्ता अरुंद झाला आहे.

त्या कामासाठी पिंपरीहून मोरवाडीच्या दिशेने जाणारा बीआरटी मार्ग वाहतुकीस बंद केला आहे. त्यामुळे वाहनचालकांची व पादचाऱ्यांची गैरसोय होत आहे. तसेच, कमला क्रॉस बिल्डिंगमधील दुकानदार व व्यावसायिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्या इमारतीच्या दर्शनी भागात जिन्याचे काम करण्यात आल्याने ये-जा करणे त्रासाचे होत आहे.



### कमला क्रॉस बिल्डिंग येथून मेट्रो स्टेशनवर ये-जा करता येणार

» पिंपरी मेट्रो स्टेशनचा हा चौथा जिना पूर्ण झाल्यानंतर कमला क्रॉस बिल्डींगसमोरील पदपथावरून स्टेशनकडे ये-जा करणे प्रवाशांना सुलभ होणार आहे. नागरिकांना मोरवाडी चौकात रस्ता क्रॉस करण्याची गरज भासणार नाही. पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून येणाऱ्या नागरिकांची या जिन्यामुळे सुविधा होणार आहे. त्यामुळे हा जिना लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

### ग्रेडसेपरेटरमध्ये धोकादायक काम

» पदपथ, सर्व्हिस रस्ता व ग्रेडसेपरेटरवरुन जिन्या उभारण्यात येत आहे. ग्रेडसेपरेटर मार्गावरून हा लोखंडी जिना बसविण्यात येत आहे. ते काम करताना सुरक्षेकडे लक्ष दिले जात नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे ग्रेडसेपरेटरमधून वेगात ये-जा करणाऱ्या वाहनांवर जिना व इतर साहित्य पडून दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

# रवींद्र धंगेकर लढणारा कार्यकर्ता : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## श्रीक्षेत्र आळंदी येथील भक्तनिवास आणि महाद्वार ते पुंडलिक मंदिर घाट सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले.

**पुणे | प्रतिनिधी**

शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर काम करणारा कार्यकर्ता आहे. अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता आहे. भाजपच्या विरोधात आपली भूमिका नसल्याचे धंगेकर यांनी स्पष्ट केले आहे. जे प्रकरण सुरू आहे, त्यावर लवकरच पडदा पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. महायुतीत दंगा करायचा नाही, असे मी धंगेकर यांना सांगितले आहे, असेही ते म्हणाले.

आळंदीतील भक्त निवास आणि महाद्वार ते पुंडलिक मंदिर घाट सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या रविवारी हस्ते झाले. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. मंत्री भरत गोगावले, शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर यावेळी उपस्थित होते.



### व्यवहार रद्द होण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द

» जैन बोर्डिंगच्या भूमी विक्रीसंदर्भात मंत्री मोहोळ यांचे नाव आल्यानंतर आणि विविध आरोप झाल्यानंतर जवळपास आठ दिवसानंतर म्हणजेच शनिवारी त्यांनी बोर्डिंगमध्ये जाऊन जैन मुनींची भेट घेतली. त्यासाठी जैन धर्मातील प्रतिष्ठित व्यक्तींचे फोन येऊन गेल्याचेही त्यांनी सांगितले. जैन धर्मियांच्या मागणीशी सहमत आहे. जर या प्रकरणात माझी काही चूक असती तर मी इथे आलो नसतो असे सांगून माझी बाजू मांडण्याकरिता इथे आलो नाही, असे सांगायला देखील मोहोळ विसरले नाहीत.

पुण्याचे भाजपचे खासदार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर जैन बोर्डिंगच्या जागेवरून धंगेकर यांच्याकडून विविध आरोप केले जात आहेत. महायुतीत एकत्र असलेल्या मोहोळ आणि धंगेकर दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. याबाबत विचारले असता उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शिवसेनेचे (शिंदे) पुणे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर काम करणारा कार्यकर्ता आहे.

अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता आहे. महायुतीत दंगा करायचा नाही, असे मी त्यांना सांगितले आहे. तो विषय आता संपला आहे. धंगेकर यांना ज्या गोष्टीची माहिती मिळाली, त्यावर ते बोलले आहेत. शेवटी महायुती आहे. विरोधकांच्या हातात कोणतेही कोलीत द्यायचे नाही, असे धंगेकर यांना सांगितले आहे. हा विषय संपेल.

आळंदीत आल्यावर मनाला समाधान मिळते. मुख्यमंत्री असताना अनेक वेळा आलो आहे. आताही सातत्याने येत आहे. आज भक्त निवासाचे भूमिपूजन झाले. चांगल्या दर्जाचे भक्त, घाट निवास होईल. वारकऱ्यांची मोठी सोय होईल. इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यावर काम सुरू आहे. राज्य शासनाने हा मुद्दा गांभीर्याने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एक सादरीकरण झाले आहे. इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करणे हे आमचे प्रमुख काम आहे. प्रदूषणमुक्त इंद्रायणी नदी करण्यासाठी जे काही करावे लागेल ते केले जाईल, असेही शिंदे म्हणाले.

### त्यांना योग्य सूचना दिल्या आहेत

» रविंद्र धंगेकर हा काम करणारा कार्यकर्ता आहे, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. त्याचवेळी महायुतीत दंगा नको, अशा सूचना दिल्याचेही हसत हसत शिंदे यांनी सांगितले. त्यावर तुमच्या सूचनेनंतरही मोहोळ यांच्याविरोधात धंगेकर यांचा आक्रमक पवित्रा कायम असल्याचे पत्रकारांनी विचारल्यावर त्यांना सूचना दिल्या आहेत, अशी सारवासारव शिंदे यांनी केली. एकंदर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धंगेकर यांच्या आवाजाला शिंदे धार लावत असल्याची चर्चा पुण्याच्या राजकीय वर्तुळात आहे. दुसरीकडे मुरलीधर मोहोळ यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन होत असलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली.

# शहरात रक्ताचा तुटवडा; रक्तदान करण्याचे पुणेकरांना आवाहन

## पुणेकरांनी जवळच्या रक्तपेढीमध्ये जाऊन रक्तदान करण्याचे आवाहन जनकल्याण रक्तपेढीने केले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीनंतर भासणारी रक्ताची चणचण दूर करण्यासाठी पुणेकरांनी जवळच्या रक्तपेढीमध्ये जाऊन रक्तदान करण्याचे आवाहन जनकल्याण रक्तपेढीने केले आहे.दरवर्षीप्रमाणे दिवाळीनंतर रक्ताची मोठी चणचण भासत आहे. थॅलसेमिया, कर्करोग आणि अन्य आजारातील रुग्णांना रक्ताचा सुलभ पुरवठा होण्यासाठी अडचण येत आहे. अपघात, बाळंतपण अशा तातडीच्या आवश्यकतेसाठीही रक्त उपलब्ध करणे अवघड झाले आहे. त्यामुळे पुणेकरांनी जवळच्या रक्तपेढीमध्ये जाऊन रक्तदान करणे आवश्यक आहे. अन्यथा रुग्णांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे, असे जनकल्याण रक्तपेढीचे कार्यकारी संचालक डॉ. अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.



आपल्या प्राथमिकतेने केलेल्या रक्तदानामुळे रुग्णाला वेळेत रक्त उपलब्ध होईल. दिवाळीनंतर आपला आणि रुग्णांचा प्रवास प्रकाशमान व्हावा यासाठी पुणेकरांनी आपल्या नातेवाईक आणि मित्रपरिवारासह जवळच्या रक्तपेढीमध्ये जाऊन मतदान करावे, असे आवाहन डॉ. कुलकर्णी यांनी केले.

दरवर्षीप्रमाणे दिवाळीनंतर रक्ताची मोठी चणचण भासत आहे. थॅलसेमिया, कर्करोग आणि अन्य आजारातील रुग्णांना रक्ताचा सुलभ पुरवठा होण्यासाठी अडचण येत आहे. अपघात, बाळंतपण अशा तातडीच्या आवश्यकतेसाठीही रक्त उपलब्ध करणे अवघड झाले आहे. त्यामुळे पुणेकरांनी जवळच्या रक्तपेढीमध्ये जाऊन रक्तदान करणे आवश्यक आहे. अन्यथा रुग्णांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे, असे जनकल्याण रक्तपेढीचे कार्यकारी संचालक डॉ. अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

आपल्या प्राथमिकतेने केलेल्या रक्तदानामुळे रुग्णाला वेळेत रक्त उपलब्ध होईल. दिवाळीनंतर आपला आणि रुग्णांचा प्रवास प्रकाशमान व्हावा यासाठी पुणेकरांनी आपल्या नातेवाईक आणि मित्रपरिवारासह जवळच्या रक्तपेढीमध्ये जाऊन मतदान करावे,

> “ जनकल्याण रक्तपेढीकडे गेल्या महिन्यापर्यंत दरमहा दोन हजार रक्त पिशव्यांचे संकलन होत होते. गेल्या महिन्यापर्यंत २९३ शिबिरे आणि रक्तपेढी संकलन मिळून १९ हजार ६४९ रक्त पिशव्यांचे संकलन झाले. त्यापैकी ऑक्टोबर महिन्यात शनिवारपर्यंत मिळून १३०० रक्त पिशव्यांचे संकलन झाले. जनकल्याण रक्तपेढीला दररोज ८० ते ९० रक्त पिशव्यांची आवश्यकता असते. ही तूट भरून काढण्यासाठी पुणेकरांनी जवळच्या रक्तपेढीमध्ये जाऊन रक्तदान करावे.
>
> - डॉ अतुल कुलकर्णी, कार्यकारी संचालक, जनकल्याण रक्तपेढी

# इच्छुकांची दीपोत्सवात ‘मतपेरणी’; पूर्व हवेलीत निवडणुकीपूर्वी संवाद

## प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणूक पडघम वाजू लागल्याने सर्वत्र राजकीय वर्दळीचे चित्र दिसून येत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पूर्व हवेलीतील काही गावात जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य होण्याची स्वप्न पाहणारे व ती सत्यात आणण्यासाठी अंगात सध्या जोरदार वारे वाहत आहे. मतदान प्रक्रियेतील गट व गणाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर निवडणूक लढवणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी सोशल मीडियावरून प्रचार सुरु करून दिवाळीनिमित्ताने पूर्व हवेलीत गाव भेट दौरे सुरू केले.

जनसंपर्क वाढवून नागरिकांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नवनवीन गिफ्ट, मिठाई, फराळ, महिलांसाठी साड्यांचेही वाटप सुरू झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये चालू आहे. यातून उमेदवार आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणूक पडघम वाजू लागल्याने सर्वत्र राजकीय वर्दळीचे चित्र दिसून येत आहे. त्यातच दिवाळीसारखा सण यामुळे या निवडणुकीला इच्छुक उमेदवारांमुळे महत्त्व प्राप्त झाले आहे. मीच कसा उमेदवारीसाठी श्रेष्ठ यासाठी नेत्यांची लगबग चालू आहे.



### उमेदवार आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न

» नवनवीन गिफ्ट, मिठाई, फराळ, महिलांसाठी साड्यांचेही वाटप सुरू झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये चालू आहे. यातून उमेदवार आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणूक पडघम वाजू लागल्याने सर्वत्र राजकीय वर्दळीचे चित्र दिसून येत आहे. त्यातच दिवाळीसारखा सण यामुळे या निवडणुकीला इच्छुक उमेदवारांमुळे महत्त्व प्राप्त झाले

मतदारांना प्रभावित करण्याच्या नानाविविध कल्पना विशेष करून प्रलोभनांचा अवलंब करण्यात येत आहे. नुकत्याच या निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण जाहीर झाल्यानंतर जिल्हा परिषदेमध्ये गट नंबर ३८ कोरेगावमूळ, गट नंबर ३९ उरळीकांचन, गट नंबर ४० थेऊर, गट नंबर ४१, लोणी काळभोर हे गट पूर्व हवेलीत येत आहे. हवेली पंचायत समितीमध्ये कोरेगाव मूळ, केसनंद, उरुळी कांचन, सोरतापवाडी, थेऊर, आव्हाळवाडी, लोणी काळभोर, कदमवाकवस्ती हे गण येतात.

जिल्हा परिषद गटामध्ये व गणामध्ये असलेल्या नागरिकांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नवनवीन गिफ्टस, मिठाई, महिलांसाठी साड्यांचेही वाटप करण्यात आल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. काही उमेदवार मतदारांना देवदर्शन करुन आणणार आहेत. यातून उमेदवार आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतू निवडणूक आयोगाच्या खर्चाबाबत नियम व अटी यानुसार जर चौकशीचा ससेमिरा मागे लागला तर तो मी नव्हेच या भूमिकेत हे सारे वाटणारे आहेत. बिनदिक्कतपणे मतदारांना विविध प्रकारच्या वस्तूंचे वाटप चालू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. निवडणुकांच्या तारखा आणखी जाहीर झालेल्या नसल्या तरीही आपणच निवडणुकीत उमेदवार असल्याचे जाहीर करून प्रत्येक गावातील वाड्यावस्तीवर जाऊन गाठीभेटी घेत आपल्याला या निवडणुकीत संधी द्यावी, अशी विनंती केली जात आहे.

### गोडधोड उत्सवाचा राजकीय मिलाफ

» अलीकडे निवडणुकीचे स्वरूपच बदलत जात आहे. कारण मतदारांना गृहीत धरून या निवडणुकीत अनेक प्रलोभने मतदारांना दाखविली जात आहेत. यामध्ये सणासुदीच्या दिवसात लागणाऱ्या मिठाई वाटपापासून ते लाडक्या बहिणींना दिवाळी भेट अर्थात भाऊबीज म्हणून साड्यांचे वाटप चालू आहे. जिल्हा परिषद सदस्य पदासाठी कधी पण काय पण करण्याची तयारी इच्छुक उमेदवारांनी सुरु केली असून अजूनही काही पक्षांच्या इच्छुक उमेदवारांनी आपली दावेदारी गुलदस्त्यातच ठेवली आहे. गावोगावी लागलेले दर्शन यात्रेचे फ्लेक्समुळे सध्या तरी या गावांतील चित्र बदलले आहे. नागरिक मात्र संभ्रमावस्थेत असून प्रमुख पक्ष्यांची उमेदवारी कोणाला मिळणार हे जाहीर झालेले नसतानाही पूर्व हवेलीतील गटात व गणात मात्र मतदारांची दिवाळी गोड होत आहे.

# बारामतीत ‘आई पर्यटन’ योजनेला प्रतिसाद

## शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र जेवरे यांच्या हस्ते चार चाकी गाड्यांचे वितरण करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

दीपावली पाडव्याच्या मुहूर्तावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार“आई पर्यटन योजनेअंतर्गत बारामती तालुक्यातील कांबळेश्वर येथील निलम शिंदे व इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथील अलका आहेर यांना शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र जेवरे यांच्या हस्ते चार चाकी गाड्यांचे वितरण करण्यात आले.



पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या हेतून महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी “आई” महिला केंद्रीत पर्यटन धोरण जाहिर करण्यात आले. त्यानुसार महिलांना पर्यटन व्यवसाय करण्यासाठी चार चाकी वाहन घेण्यासाठी कामी बिनव्याजी १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होत आहे.

योजनेचा फायदा घेण्यासाठी महिलांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन शिवसेना जिल्हा प्रमुख जेवरे यांनी बारामती येथे केले होते. त्यानुसार महिलांनी अर्ज सादर केले. बारामती तालुक्यातील कांबळेश्वर येथील निलम शिंदे व इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथील अलका आहेर यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला.

नीलम शिंदे यांनी मारुती सुझुकीची ईरटीगा तर अलका आहेर यांनी नेक्साची एक्सएलसिक्स ही चार चाकी गाडी घेतली. सरकारच्या योजनेतून बिनव्याजी पंधरा लाख रुपयांचे कर्ज वितरण करून वाहने देण्यात आली. लाभार्थी महिला व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी सुरेंद्र देवरे यांचे यावेळी आभार मानले. महालक्ष्मी ऑटोमेटिव्हचे मुख्याधिकारी संदीप पवार यांचे याकामी सहकार्य झाले.

दीपावली पाडव्याच्या मुहूर्तावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार“आई पर्यटन योजनेअंतर्गत बारामती तालुक्यातील कांबळेश्वर येथील निलम शिंदे व इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथील अलका आहेर यांना शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र जेवरे यांच्या हस्ते चार चाकी गाड्यांचे वितरण करण्यात आले.

> “ महिलांमध्ये उद्योजकता व नेतृत्व गुण विकसित करण्याच्या हेतूने सरकारने आई पर्यटन योजना सुरू केले आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना व्यवसायाची संधी मिळणार आहे. योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन शिवसेनेच्या वतीने बारामतीत केले होते. त्यानुसार महिलांनी अर्ज सादर केले. त्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही मदत केली. जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा. त्यासाठी आम्ही सर्वोत्परी मदत करू.
>
> \- सुरेंद्र जेवरे, शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख